ग्रीनलॉन्स विदयालय

इयत्ता - ५वी-अ,ब,क — **TERMINAL EXAMINATION** — मार्क – ८०

दिनांक-२६ -०९-२०२४ — विषय – मराठी — वेळ- २ तास

INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and section B.
2. Section A answers must be written on the answer sheet.
3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet.

## विभाग- "अ"

**प्रश्न १ रिकाम्या जागा भरा. (कोणतेही ५)** (५)

१. नदी म्हणून माझा ---------- थांबतो.

( प्रवास, प्रवाह, जन्म )

२. ---------- झाडीतून बाहेर आले.

( मोर, कबूतर, बदक )

३. मोराने पिसांचे ---------- केले.

( निरखून, दुर्लक्ष, निरीक्षण )

४. ---------- रुपाने पर्वतावरून खाली येते.

( नदीच्या, धबधब्याच्या,धरणाच्या )

५. पर्वतउतारावरून नदी ----------मैदानी भागात येते.

( खोलगट, सपाट, सरळ )

६. कोंबडी ---------- जाऊन बसली.

( गोठयात, खुराडयात, गुहेत )

**प्रश्न २ अ) खालील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा. (कोणतेही ५)** (५)

१. माणसे नदीला अडवायला काय बांधतात ?

( समुद्र, धरण, धबधबा )

२. फुलांपासून काय घेता येईल ?

( गाणे, गंध, जगणे )

३. झाडापासून काय घेता येईल ?

( नवे तराणे, शांती, सावली )

४. शेवटी नदी कोणाला जाऊन मिळते ?

( सागराला, धबधब्याला, पावसाला )

५. नदीकिनारी काय होती ?

( पिसारा, दाट झाडी, पाने )

६. मिनूचे घर कोठे होते ?

( गावात, शाळेत, शेतात )

**प्रश्न २ ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ६)** (६)

१. नदीचा जन्म कोठे होतो ?

२. नदी कशी मोठी होते ?

३. मिनू कोणाकोणाला भेटली ?

४. प्रभातकाळी काय शिकूया ?

५. नदी आपल्याला कोणता संदेश देते ?

६. पिसे कोणाची होती ?

७. निसर्गाचे विविध घटक कोणते ?

८. नदीच्या पाण्याचा उपयोग लोक कशासाठी करतात ?

**प्रश्न २ क) खालील कविता पूर्ण करा.** (४)

( ताऱ्यापासुन, झऱ्यापासुनी, होउनी, सावली, तराणे, घेऊ, जगणे, नवे )

१. झुळझुळणाऱ्या ..............................

.................... .................... .................... .

**प्रश्न ३ खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.(Choose the correct option and rewrite the sentence.)** (४)

१. कोंबडीने पिसांकडे ..............................

अ. निरीक्षण केले.

ब. निरखून पाहिले.

क. जवळून पाहिले.

२. नदीच्या पाण्याने ..............................................

अ. वीज तयार करतात.

ब. सांडपाणी तयार करतात.

क. परिसर तयार करतात.

३. समोरून आपला पिसारा सावरत ..............................................

अ. बदक येत होते.

ब. मोर येत होता.

क. कबूतर येत होते.

४. बदकाने दिलेली पिसे आपल्या ..............................................

अ. वहीत ठेवली.

ब. कपाटात ठेवली.

क. मैत्रीणीला दिली.

**प्रश्न ४ खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.** (६)

१. माझा आवडता पक्षी

( पक्ष्याचे नाव - रंग - आवड व निवड - वर्णन - गुण - आवडण्याची कारणे )

२. मी नदी बोलते

( नदीचे नाव - जन्म - महत्व - उपयोग - प्रदूषण - प्रवास )

३. माझी आई

( आईचे नाव - शिक्षण - स्वभाव - तुमच्यासाठी काय करते - काळजी - आईचे प्रेम )



P.T.O.

**प्रश्न ५ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१०)**

लहानपणापासून मेधाला मराठी भाषा शिकायला खूप आवडते. म्हणून दर शनिवारी ती मराठी वर्गाला जाते.एकदा गुरुजी 'आपले सण' हा धडा शिकवीत होते.ते म्हणाले,"मुलांनो, काही हिंदू सणांची नावे सांगा पाहू." वर्गातील मुले विचार करू लागली.मेधाने पटकन 'गुढी पाडवा, गणेश चतुर्थी, दिवाळी व मकरसंक्रांत' ही नावे सांगितली."शाब्बास मेधा!" असे गुरुजी म्हणाले.

विजयाने महाशिवरात्री व होळी ही नावे सांगितली.गुरुजी म्हणाले," फार छान!" लगेच प्रमोद हात वर करून मोठयाने म्हणाला, "नवरात्र , रक्षाबंधन, रामनवमी व श्री कृष्ण जयंतीही आम्ही साजरी करतो." गुरुजींनी मुलांना समजावून सांगितले की हे सण देवळातही साजरे केले जातात.

वर्गात गुरुजींनी मुलांना सणांविषयी बरीच माहिती दिली.ते म्हणाले," सणांमुळे आपल्याला आनंद मिळतो व फायदेही होतात. आपल्याला अनेक लोक भेटतात. आम्ही एकत्र येतो. आपल्यामध्ये आदर व एकता निर्माण होते. म्हणून आम्हाला आपले सण शिस्तीने व भक्तीभावाने साजरे केले पाहिजे.

प्रश्न :

१. मुलांनी सांगितलेल्या चार सणांची नावे लिहा. (२)

२. लहानपणापासून कोणाला मराठी भाषा शिकायला आवडते ? (१)

३. कोणत्या दिवशी मेधा मराठी वर्गात जाते ? (१)

४. रिकाम्या जागा भरा. (२)

अ. मुलांनो, काही ---------------- सणांची नावे सांगा पाहू.

ब. आपल्यामध्ये आदर व ---------------- निर्माण होते .

५. समानार्थी शब्द लिहा. (२)

[ आनंद, हात, देऊळ, दिवाळी ]

१. हर्ष =---------------- २.दीपावली = ----------------

६. विरूद्धार्थी शब्द लिहा. (२)

[ दु:ख, आवडते, खूप, छान ]

१. नावडते X ---------------- २. कमी X ----------------

INSTRUCTIONS- Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet.

नाव - ........................................ हजेरी क्रमांक - इयत्ता -५-अ ,ब,क

विभाग - 'ब'

**प्रश्न १ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून लिहा.** (३)

१. मुंबई हे मोठे शहर आहे.

**नाम** : ........................................

२. एका जंगलात सिंह राहायचा.

**नाम** : ........................................

३. बादशहाने बिरबलला प्रश्न विचारला.

**नाम** : ........................................

**प्रश्न १ ब) खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखून लिहा.** (३)

१. ही माझी वही आहे.

**सर्वनाम** : ........................................

२. आई,बाबा, तुम्ही मला सर्कस दाखवाल का?

**सर्वनाम** : ........................................

३. आम्ही तुला मदत करू.

**सर्वनाम** : ........................................

**प्रश्न १ क) खालील वाक्यांतील विशेषणे ओळखून लिहा.** (३)

१. बेडकाचे डोळे गोल व मोठे आहेत.

**विशेषण** : ........................................

२. बाबांनी नवीन सायकल आणली.

**विशेषण** : ........................................

३. पोपटाचा रंग हिरवा असतो.

**विशेषण** : ........................................

प्रश्न १ ड) खालील वाक्यांतील क्रियापदे ओळखून लिहा. (३)

१. ताई छान-छान पुस्तके वाचायला देते.

क्रियापद : ..............................

२. त्या दिवशी गुरुवार होता.

क्रियापद : ..............................

३. गाडीतील एकजण ओरडला.

क्रियापद : ..............................

प्रश्न २ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (४)

( नृत्य, भगिनी, खग, जास्त, हवा, खेडे, रावा )

१. बहीण = .................... ३. पवन = ....................

२. गाव = .................... ४. पक्षी = ....................

प्रश्न २ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (४)

( परका, वर, आत, सखल, कुरुप, हलके, विसरणे )

१. बाहेर X .................... ३. सुंदर X ....................

२. जड X .................... ४. आपला X ....................

प्रश्न ३ अ) खालील शब्दांचे वचन बदला. (४)

१. कारखाना - .................... ३. खुराडे - ....................

२. वस्ती - .................... ४. तारा - ....................

प्रश्न ३ ब) खालील शब्दांचे लिंग बदला. (४)

१. वधू - .................... ३. दास - ....................

२. मोर - .................... ४. राजकुमार - ....................

**प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा.** (३)

१. झरा - ..............................

२. किनारा - ..............................

३. मोहक - ..............................

**प्रश्न ४ ब) जोडया जुळवा.** (४)

| क्र. | "अ" गट | "उत्तर" | "ब" गट |
|---|---|---|---|
| १. | कबूतर | .............................. | नदी |
| २. | बदक | .............................. | मोहक पिसारा |
| ३. | मोर | .............................. | खुराडे |
| ४. | कोंबडी | .............................. | झाड |

**प्रश्न ५ अ) खालील शब्दांपासून वाक्य बनवा.** (३)

१. पर्वत - ............................................................

२. चंद्र - ............................................................

३. सूर्य - ............................................................

**प्रश्न ५ ब) खालील अचूक शब्द ओळखा.** (२)

१. निरीक्षण / निरिक्षन / निरिक्षण - ..............................

२. प्रदुषित / प्रदूषित / पदूषित - ..............................

**************************